REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हिंदू कोडबिल

प्रा. तळणीकर एस. जी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख , तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगांव.

## प्रस्तावना–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजसुधारणा करण्यासाठी हिंदू कोडबिल तयार केले. पारंपारिक भारतीय समाजाने धर्मशास्त्र, मनुस्मृतीचा दाखला देऊन स्त्रीयांचे हक्क आणि अधिकार नाकारले. ते सर्व हक्क आणि अधिकार हिंदू कोडबिलाने स्त्रीयांना दिले आहेत. हिंदू कोडबिलाच्या माध्यमातून अनेक मुलभूत अधिकार स्त्रीयांना मिळवून देऊन संपूर्ण भारतीय स्त्रीयांच्या प्रगतीचा, विकासाचा, उन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला.

डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले, कारण मनूने शुद्र व स्त्रीयांचे मानवी हक्क हिरावून घेतले. मनुस्मृती हा ग्रंथ समाजात विषमता निर्माण करतो. म्हणून आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले. डॉ. आंबेडकरांनी संपूर्ण समाजव्यवस्थेत परिवर्तन केले आणि हे परिवर्तन कायद्याव्दारे करण्याचा त्यांचा मानस होता. इ.स.1948 साली डॉ. आंबेडकरांनी समस्त स्त्रीयांच्या उन्नतीसाठी, विकासासाठी हिंदू कोडबिल तयार करून संसदेत मांडले. स्त्रीयांना त्यांचे हक्क मिळण्यासाठी केवळ उपदेश करून भागनार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष कायद्यातच तरतूद करावी लागेल. म्हणून त्यांनी हिंदू कोडबिल तयार केले.

## हिंदू कोडबिलातील तरतूदी :

हिंदू कोडबिलाव्दारे समाजातील विषमता नष्ट करणे, स्त्रीयांना पुरूशांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करून देणे हीच डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. हिंदू कोडबिलातील तरतूदी खालीलप्रमाणे आहेत.

1. विवाहस्वातंत्र्यः भारतीय स्त्रीला स्वतःच्या इच्छेनुसार विवाह करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.
2. विवाहविच्छेदः विवाहानंतर पत्नी व पतीचे जमत नसेल किंवा त्यांचा संसार योग्य पद्धतीने चालत नसेल, दोघांपैकी कोणी वेडा असेल, प्रजनन क्षमता नसेल, जबरदस्तीने विवाह लावला असेल तर स्त्रीला विवाहविच्छेद करता येतो.
3. घटस्फोटः पुढील कारणावरून घटस्फोट घेता येऊ षकतो. 1) परित्याग 2) धर्मपरिवर्तन 3) रखेली ठेवणे 4) दुर्दम्य आजार 5) संक्रमणगुप्त रोग 6) अमानवीय व्यवहार यामूळे स्त्रीला घटस्फोट घेण्याची व्यवस्था केली.
4. दत्तक घेणे : स्त्रीला स्वतःचे मूल नसेल तर ती मुलगी किंवा मुलाला दत्तक घेऊ षकते. दत्तक हा तिच्या नातलगातील, सासर किंवा माहेरकडील किंवा अनाथ आश्रमातून कायद्याने दत्तक घेऊ षकते.




5. संपत्ती : प्रत्येक स्त्रीला पुरूशाच्या बरोबरीने सासर व माहेरच्या संपत्तीमध्ये वारसा हक्क मिळण्याची तरतूद केली.
6. उत्तराधिकारीः हिंदू विधवेच्या पतीने आपल्या वसिहतनाम्यात अभिवाचक नेमला नसेल तर पतीच्या मृत्यूनंतर आपला अभिवाचक नेमण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला देण्यात आले.
7. पोटगीः कोणत्याही स्त्रीला जर तिच्या नवऱ्याने सोडले तर तिला त्याच्या कमाईचा काही भाग पोटगी म्हणून मिळाला पाहिजे यासाठी कायदेशीर

तरतूद करण्यात आली. पाहिली पत्नी हयात असतांना जर पतीने लग्न केले तर त्या पतीला शिक्षा होते.

प्रचलीत समाजव्यवस्थेत स्त्रीयांचा सामाजिक दर्जा उंचाविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी अतिशय परिश्रमपूर्वक हिंदू कोडबिल तयार केले. या बिलाला अनेक सनातनी व प्रतिगामी लोकांनी विरोध केला. पंडित नेहरूंनी निवडणूका समोर ठेऊन हिंदू कोडबिल 26 सप्टेंबर 1951 रोजी स्थगित केले. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. पुढे हरिभाऊ पारसकर या ब्राम्हण व्यक्तीची निवड हिंदू कोडबिलाच्या मंजूरीसाठी करण्यात आली व बिल खण्डशःपास झाले. स्त्रीपुरूष समतेचा शेवटी विजय झाला.

## स्त्रीविकासात हिंदू कोडबिलाचे योगदानः

हिंदू कोडबिलामुळे स्त्रीयांमध्ये अमूलाग्र मानसीक, सामाजीक, वैचारिक परिवर्तन घडून आले. स्त्रीची आस्मिता जागृक झाली व मान उंच करून ती डोळसपणे जगाकडे पाहू लागली. स्त्रीया मंत्रिमंडळात विविध पदे भूषवू लागल्या. सर्व क्षेत्रामध्ये प्रवेश करणे सुलभ झाले. सनदशीर आणि कायदेशीर तरतुदींशिवाय स्त्रीयांवरील अन्याय कमी होणार नाही हे आंबेडकरांनी ओळखले होते. स्त्रीपुरूष समानतेशिवाय लोकशाही भारतात टिकणार नाही हे त्यांचे स्पष्ट मत होते.

## निष्कर्षः

पारंपारिक भारतीय समाजरचनेत स्त्रीयांचा सामाजिक दर्जा खालावला होता. अनिष्ट चालिरिती, रूढी, प्रथा, परंपरामुळे स्त्रीयांचे शोषण होत होते. स्त्रीयांना सर्व प्रकारच्या शोषणा पासून मुक्ती देणे, स्वातंत्र्य मिळवून देणे, स्त्रीयांचे सक्षमीकरण घ्‌डवून आणणे, सामाजाची मानसिकता बदलणे हाच हिंदू कोडबिलामागचा डॉ. आंबेडकरांचा मुख्य हेतू होता.

## संदर्भसूचीः

1. किर धनंजय – डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 1989.
2. खैरमोडे चांगदेव – डॉ. आंबेडकर आणि कोडबिल, सुगावा प्रकाशन, पुणे
3- गणवीर सरकार – डॉ. आंबेडकर व हिंदू कोडबिल नेहा प्रकाशन, नागपूर
4- लोकराज्य – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक, मुंबई, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय.